# 'मेट्रो ३'च्या गिरगाव पुनर्वसन प्रकल्पाच्या निविदेला मोठा प्रतिसाद

▶ मुंबई *(प्रतिनिधी)*

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे गिरगाव येथील प्रकल्पबाधितांसाठी इमारत बांधण्यात येत असून त्या साठी मागविलेल्या पूर्व अर्हता निविदेला बांधकाम क्षेत्रातील कंपन्यां चा भरघोस प्रतिसाद लाभला. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पा मुळे बाधित झालेले रहिवासी, व्यावसायिक व कार्यालयांचे पुनर्वसन गिरगाव येथे बांधण्यात येणार असलेल्या या इमारतीमध्ये केले जाणार आहे. गिरगाव पुनर्विकास इमारतीमध्ये ४७३ रहिवासी सदनिका, १३७ व्यावसायिक आस्थापना व १९ व्यावसायिक कार्यालयांचा समावेश राहील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

कॉर्पोरेशनद्वारे लवकरात लवकर पूर्वअर्हता प्रक्रिया पूर्ण करून केली जाणार आहे. या प्रक्रियेमार्फत निवडलेल्या कंपन्यांद्वारे निविदा मागविण्यात येतील. या ४८ मजली इमारतीचे तीन तळमजले सेवा तसेच पार्किंगसाठी राखीव असतील. ग्राउंड लेव्हल, एक ते सात मजले अंशतः व्यावसायिक गाळे व सेवा देण्या साठी राखीव असतील. तर आठ ते नऊ मजले व्यावसायिक गाळे, सेवा तसेच सुविधांसाठी राखीव असतील. १० ते १८ मजल्यांवर व्यावसायिक गाळे तसेच सदनिका असतील व १९ ते ४८ मजल्यांवर रहिवासी सदनिका असतील. या इमारतीस कार पार्किंगची सुविधा तसेच बगीचा आदी सुविधा राहतील. एकूण ४८ मजल्यांपैकी ३९ मजले रहिवासी सदनिकांसाठी राखीव असतील, असे कॉर्पोरेशन कडून सांगण्यात आले.